# ऐक्य

८९ वर्षांची वाचनीय परंपरा

सातारा मंगळवार दि. १७/१२/२०१३ रुपये २


## मुकुल माधव फौंडेशनच्या मदतीने शाळांचे रूपडे पालटले : सौ. कांबळे

▲ पाचगणी, दि.१६ : सामाजिक काम करताना दातृत्वाच्या भावनेने केलेले काम आदर्शवत ठरते. याच माध्यमातून मुकुल माधव फौंडेशनने पाचगणीतील नगरपालिका शाळांना केलेल्या भरघोस मदतीने पालिका शाळांचे रूपडे पालटले असल्याचे प्रतिपादन नगरपालिकेच्या शिक्षण सभापती सौ.रेखा कांबळे यांनी केले. पाचगणी, ता.महाबळेश्वर येथील नगरपरिषद शाळा क्र. १ व २ मधील विद्यार्थ्यांना पुण्याच्या मुकुल माधव फौंडेशनच्यावतीने स्वेटर व शूज वितरण कार्यक्रमप्रसंगी सौ. रेखा कांबळे बोलत होत्या. यावेळी मुकुल माधव फौंडेशनच्या प्रिया बिल्खा, जितेंद्र जाधव, सौ. गौरी क्षीरसागर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नारायण निकुरे, मुख्याध्यापक रमेश भोये, लक्ष्मण हिरवे उपस्थित होते.

सौ.कांबळे म्हणाल्या, नगरपालिका शाळांमधील गरीब विद्यार्थ्यांना गेल्या सहा वर्षापासून मुकुल माधव फौंडेशनने केलेल्या मदतीमुळे दोन्ही शाळांमध्ये आमूलाग्र बदल घडलेला दिसत आहे. या संस्थेच्या ट्रस्टी रितुबेन छाब्रिया यांनी दाखवलेला मदतीचा हात यापुढेही कायम रहावा. मुख्याध्यापक लक्ष्मण हिरवे यांनी प्रास्ताविकात सांगितले, मुकुल माधव फौंडेशन दर दोन वर्षांनी शाळेतील मुलांना स्वेटर व शूज पुरविते. शाळेतील मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून दहा तबला संच भेट दिले आहेत. त्यामुळे संगीत शिक्षणात मुले पारंगत होत आहेत. मुलांचा शारीरिक विकास व्हावा म्हणून मोफत कराटे प्रशिक्षण उपलब्ध करून दिले आहे. फौंडेशनच्यावतीने इंग्रजी विषयाचे शिक्षक स्वतः नेमून सेमी इंग्रजीच्या मुलांना मोलाची मदत केली आहे. आधुनिक तंत्रज्ञान मिळावे म्हणून शाळेला प्रोजेक्टर पुरविला आहे. शाळेसाठी प्रयोगशाळा पुरविली आहे. या सर्व मदतीने आम्ही सर्वजण भारावून गेलो आहोत. आम्हाला खात्री आहे या सर्वांचा फायदा घेऊन गुणवत्तापूर्ण पिढी निर्माण करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. कु.प्रिया बिल्खा यांनी शिक्षकांना विविध साधनांचा वापर करून इंग्रजी भाषा कशी शिकवावी याबाबत मार्गदर्शन केले. गौरी क्षीरसागर यांनी मुलांना इंग्रजीचे महत्त्व विषद केले. स्वागत रमेश भोये यांनी केले तर आभार लक्ष्मण हिरवे यांनी मानले.



स्वेटर वाटप करताना रेखा कांबळे व प्रिया बिल्खा, शेजारी गौरी क्षीरसागर, रमेश भोये व इतर. (सुनील शिंदे)